|| श्री गणेशाय नमः ||

हरिःॐ


Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078



# प्रदोष व्रत माहात्म्य

## पूजा आणि व्रतकथा

तुकाराम बुक डेपो मुंबई - ४.

ॐ

भक्तकवी मिलिंदमाधव विरचित

# प्रदोषव्रत माहात्म्य, पूजा आणि व्रतकथा

किंमत १५ रुपये

or Hariom Astrologers
Proprietor

गुरुकृपा धार्मिक ग्रंथ भांडार
सर्व पुजा साहित्य उपलब्ध
फोन : 24710817 मोबा. : 9969107980, 9892570177

**तुकाराम बुक डेपो** माधवबाग, मुंबई - ४०० ००४ * दूरध्वनी : २२४२१६८९

## प्रदोषव्रताचे शिवपूजन

सूर्यास्तापूर्वी एक-दीड तास आणि सूर्यास्तानंतर एक-दीड तास, या वेळेला सामान्यपणे प्रदोषकाल मानतात. या वेळी व्रत करणाऱ्यांनी स्नान करून स्वच्छ वस्त्र नेसावे आणि शिवलिंगाच्या, शिवमूर्तीच्या अगर शिवाच्या तसबिरीच्या समोर बसून, प्रथम आचमन करावे आणि 'ॐ शिवाय नमः' म्हणून शिवाला नमस्कार करून, पुढीलप्रमाणे सोपे दशोपचार शिवपूजन करावे. हे एक प्रभावी शिवव्रत आहे. हे केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात.

१. **आवाहन** : आवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि। अक्षता वाहाव्या.

२. **स्नानं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। शिवावर पाणी ओतावे अगर बेलाच्या पानाने पाणी शिंपडावे.

३. **वस्त्रं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। वस्त्र अर्पण करावे.

४. **चंदनं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। गंध लावावे.

५. **पुष्पाणि समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। फुले वाहावी.

६. **दीपं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। अगरबत्ती किंवा पेटते नीरांजन ओवाळावे.

७. **नैवेद्यं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। गूळ, साखर, केळे इत्यादींपैकी एखाद्या पदार्थाचा नैवेद्य दाखवावा.

८. **तांबूलं समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। विडा अर्पण करावा.

९. **द्रव्यदक्षिणा समर्पयामि**। ॐ शिवाय नमः। सव्वा रुपया देवापुढे ठेवून पाणी सोडावे.

१०. **नमस्कारान् समर्पयामि**। मृत्युंजयाय रुद्राय नीलकंठाय शंभवे। अमृतेशाय शर्वाय महादेवाय ते नमः ।। ॐ शिवाय नमः। नमस्कार करावा आणि पूजासमाप्तीचे पाणी सोडावे.

**विसर्जन** : दुसऱ्या दिवशी खालील मंत्र म्हणून देवावर अक्षता वाहाव्या.

गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ स्वस्थाने परमेश्वर। यत्रब्रह्मोदयो देवास्तत्र गच्छ गिरिजापते।। पुनरागमनाय च। पाणी सोडावे.

---



॥ ॐ ॥

भक्तकवी मिलिंदमाधव विरचित

# प्रदोषव्रत माहात्म्य, पूजा आणि व्रतकथा

ॐ शिवाय नमः ।। ॐ नमो श्रीगजवदना। गणराया गौरीनंदना। विघ्नेशा भवभयहरणा। नमन माझे साष्टांगी ।।१ ।। नंतर नमिली श्रीसरस्वती। जगन्माता भगवती। ब्रह्मकुमारी वीणावती। विद्यादात्री विश्वाची ।।२ ।। नमन तैसे गुरुवर्या। सुखनिधान सद्गुरुराया। स्मरुनी त्या पवित्र पायां। चित्तशुद्धी जाहली ।।३ ।। थोर महात्मे संतजन। बुधगण आणि सज्जन। करुनि तयांसी नमन। प्रदोषव्रतकथा आरंभिली ।।४ ।। नैमिषारण्यी ऋषिमुनींना। सूताने ज्या कथा नाना। सांगितल्या होत्या सर्वांना। त्यांतीलच एक ही असे ।।५ ।। ॐ शिवाय नमः म्हणून। मनी आठवावे शिवध्यान। आणि ऐकावे हे व्रतविधान। म्हणे

मिलिंदमाधव ।।६ ।। कोणे एके काळी एका स्थानी। राहात होती एक
ब्राह्मणी। दरिद्री दुर्दैवी असुनी। जीवन कंठी कसेबसे।।७।। तिला होता
४ एक पुत्र सुंदर। पाळलेला होता एक राजकुमार। अशा तिघाजणांचा ४
संसार। ब्राह्मणी ती चालवी।।८।। एकदा येताना शिवमंदिरातून।
शांडिल्य ऋषींचे घडले दर्शन। तेव्हा ऋषींच्या मुखातून। दिव्य बोल
ऐकिले ।।९।। जे पीडले असतील दारिद्र्यदुःखाने। अशा प्रत्येक
स्त्रीपुरुषाने। प्रदोषव्रत करावे नेमाने। सुखी व्हावया या जगी।।१०।।
ब्राह्मणीने ते ऐकून। शांडिल्यऋषींचे धरिले चरण। म्हणाली व्रताचे
विधिविधान। कृपा करून सांगावे।।११।। ऋषी म्हणाले त्या स्त्रीला।
प्रत्येक पक्षातील त्रयोदशीला। संतुष्ट कराया शंकराला। पक्षप्रदोषव्रत
करावे।।१२।। सायंकाळी शुचिर्भूत होऊन। विविध उपचारे करावे
शिवपूजन। शिवाचे करावे नामस्मरण। हात दोन्ही जोडुनी।।१३।।
जयदेव जगन्नाथा। जय शंकरा शाश्वता। जय सर्व सुरार्चिता। जय सर्व

सुराध्यक्षा।।१४।। जय सर्व गुणातीता। जय सर्व विश्ववंदिता। जय जय
आराध्यदैवता। जय विश्वंभरा अव्यया।।१५।। जय शंभो उमारमणा। जय
५ नित्यनिरंजना। जय भक्तार्तिभंजना। जय नाथा कृपासिंधो।।१६।। सुकर ५
करी या दुस्तरभवा। संसार सागरोत्तारणा देवा। प्रसन्न हो हे महादेवा।
जीवनव्यथा दूर करी।।१७।। सर्व पापक्षय करून। परमेश्वरा करी माझे
रक्षण। महादारिद्र्य दूर करून। महापापे हरी सर्वही।।१८।। पापग्रहांनी
पिडलेल्यांना। प्रसन्न हो तू भगवाना। ऐसी नानापरी करावी प्रार्थना।
पूजांती गिरिजापतीची।।१९।। दुसऱ्या दिवशी करावे विसर्जन।
गोरगरिबांसी द्यावे अन्नदान। मनी असावे समाधान। प्रदोषव्रत
करताना।।२०।। व्रतदिनी एक वेळ करावे उपोषण। मनी स्मरावा
शंकरभगवान। व्हावया दारिद्र्य व्याधी निवारण। प्रदोषसमयी शिवपूजन
करावे।।२१।। एक वर्षभर प्रदोषव्रत करून। मनोरथ पूर्ण करी

श्रीभगवान। चारही पुरुषार्थांची प्राप्ती जाण। होते हे व्रत केल्याने ।।२२।।
ब्राह्मणी ऋषीला गेली शरण। म्हणाली आज मी झाले धन्य। दोघे
मुलगेही तुमचे चरण। वंदिती आता आदरे ।।२३।। माझा मुलगा हा
शुचिव्रत। मानलेला पुत्र हा धर्मगुप्त। तो आहे अनाथ राजपुत्र। परंतु मी
वाढविला असे ।।२४।। आमच्या मस्तकी ठेवा वरदहस्त। अनुग्रहे करावे
कृतार्थ। दारिद्र्यदुःख निवारणार्थ। व्रत हे आम्ही आचरू ।।२५।।
शांडिल्यमुनींचा आशीर्वाद घेऊनी। ती तिघे आली अपुल्या सदनी।
आणि मग तेव्हापासुनी। शिवपूजन करू लागली ।।२६।। प्रत्येक
पक्षातील त्रयोदशी दिवशी। तिघेही राहाती उपाशी। आणि प्रदोष
वेळसी। शिवाचे करिती पूजन ।।२७।। ऐसे चार महिने गेले।
शुचिव्रताच्या मनात आले। पाहुनि यावे वनोद्यानातले। सौंदर्य प्रत्यक्ष
जाऊनी ।।२८।। ऐसा विचार येता मनी। ब्राह्मणीपुत्र तो गेला वनी। तेव्हा



वाटेत एका ठिकाणी। वस्तु एक दिसली आगळी ।।२९।। जवळ जाऊनी
पाहाता। सुवर्णमुद्रांनी भरलेला हंडा होता। त्याला इतका आनंद झाला
म्हणता। की काही विचारू नका ।।३०।। प्रदोषव्रताचा हा प्रताप।
प्रत्ययास आला आपोआप। ऐसे मानुनी तो अमाप। धन्यवाद देई
शंकराला ।।३१।। हंडा घेऊनी डोक्यावरी। ब्राह्मणीपुत्र आला घरी।
मातेसी म्हणे 'आई, पहा तरी। शिवकृपे काय मिळाले ते' ।।३२।। माताही
पाहुनी संतुष्टली। शिवशंकरासी शरण गेली। आणि स्वपुत्राला म्हणाली।
दोघांनी सुवर्ण घ्या वाटुनी ।।३३।। ते ऐकूनी राजपुत्र म्हणाला।
सुवर्णनिधी हा शुचिव्रतास मिळाला। तो त्याचाच आहे सगळा। त्यावरी
माझा अधिकार नसे ।।३४।। जर शिवकृपा होईल माझेवरी। माझेही
कल्याण होईल तरी। उगीच दुसऱ्याचे द्रव्यावरी। हक्क कसा सांगू
मी ।।३५।। राजपुत्र होता जरी अनाथ। तरी उदारता होती मनात।

द्रव्यलालसा नव्हती यत्किंचित। शिवचिंतनी तो मग्न असे ।।३६।। एकदा मग काय झाले। ते दोघेही वनात गेले। तेथे मोठे नवल वर्तले। दोघेही आश्चर्यचकित जाहले ।।३७।। अनेक सुंदर तरुण युवती। एकीहून एक लावण्यवती। नाना तऱ्हेच्या क्रीडा करिती। ऐसे दृश्य देखिले ।।३८।। सोन्यामोत्यांचे रत्नहार। गळ्यांत त्यांच्या शोभती फार। कानी कुंडले भरपूर केशसंभार। आणि गोल पुष्ट उरोज ।।३९।। सौष्ठवपूर्ण भरदार शरीर। सिंहकटि चाल डौलदार। मृगनयना भुवया कमानदार। लालचुटुक होते ओठ ते ।।४०।। पाहुनी तरुणी अप्सरेसमान। राजपुत्राचे हरले भान। गेला जवळी धैर्य करून। विचारपूस करावया ।।४१।। म्हणे सुंदरीनो तुम्ही कोण। तुमच्या पित्याचे काय नामाभिधान। तुमचे दिव्य लावण्य पाहून। आकर्षित मन जाहले ।।४२।। राजपुत्राचे ते भाषण। गोड मधुर अमृतासमान। एका युवतीने ऐकून। ती इतरांना म्हणाली ।।४३।।

८

For Hariom Astrologers
Proprietor

सख्यांनो तुम्ही जा नजिकच्या उपवनात। तेथील विशाल सरोवरात। जी सुंदर कमळे फुलतात। ती घेऊनी सावकाश या ।।४४।। ती त्या तरुणास पाहुनी। प्रेमविव्हळ झाली होती मनी। दूर गेल्यावर इतरजणी। ती त्या तरुणास म्हणाली ।।४५।। मदनासम तुम्ही आहात देखणे। मी तुम्हांस वरिले मनाने। कृपा करूनी थोर मने। स्वीकार माझा करावा ।।४६।। मी अंशुमती नामे गंधर्वदुहिता। गंधर्वराज विद्रविक माझे पिता। ते तुम्हांसम जामात मिळता। अपार द्रव्य देतील ।।४७।। आता सांगा तुम्ही कोण। दिसता तरुण कुलिन भाग्यवान। पुरुषश्रेष्ठ तुमच्या समान। अन्य नाही पाहिला ।।४८।। तिचे भाषण होता समाप्त। तिला म्हणाला धर्मगुप्त। मला ना पितामाता ना आप्त। अनाथ दुर्दैवी आहे मी ।।४९।। विदर्भाधीशराजाचा मी पुत्र। शत्रूने राज्य घेतले समस्त। मातापिता दुरावले अकस्मात। पोरका झालो या जगी ।।५०।। एक आहे सज्जन

९

ब्राह्मणी। तिने मला पुत्र समजुनी। वाढविले लहानपणापासुनी। ऐसे माझे
चरित्र असे ।।५१।। तुझे आहेत मातापिता। त्यांची संमति न घेता।
१० माझ्यासारख्याशी लग्न करिता। जग सारे हसेल तुला ।।५२।। १०
तारुण्यमदाने मुसमुसलेली। स्वरूपसुंदरी जरी स्वाधीन झाली। तरीही
संयमवृत्ति नाही ढळली। होताच तसा शीलवंत तो ।।५३।। गंधर्वकन्या
गोड स्मित करुनी। म्हणाली तिसऱ्या दिवशी आजपासुनी। परत यावे
याच ठिकाणी। वाट पाहीन मी तुमची ।।५४।। प्रेम जडले जे
प्रथमदर्शनी। काहीतरी भलेच घडेल त्यातुनी। असे मला वाटते
मनापासुनी। आपण निश्चिंत असावे ।।५५।। मात्र विसरू नका
यावयाला। उगीच तिष्ठत ठेवू नका मला। घेऊन येईन मी पित्याला।
घडेल सर्व इच्छेप्रमाणे ।।५६।। अंशुमती मग सख्यांसहित। सदनी
अपुल्या गेली परत। राजपुत्र आणि तो ब्राह्मणीसुत। स्वस्थानासी

परतले ।।५७।। दरम्यान एक घटना घडली। गंधर्वराजाने शिवाची भेट
घेतली। तेव्हा बोलणी काय झाली। तेच आता ऐकावे ।।५८।। शिव म्हणे
११ विद्रविकाला। धर्मगुप्त आहे तरुण भला। योग्य पति शोभेल तुझ्या ११
कन्येला। विवाह त्यांचा करावा ।।५९।। हा हा म्हणता ठरलेला। दिवस
एकदाचा उजाडला। विद्रविक आपल्या कन्येला। घेऊनी आला त्या
वनी ।।६०।। शुचिव्रत आणि धर्मगुप्त। आधीच होते तिथे उपस्थित।
ओळखी उभय पक्षांच्या यथास्थित। झाल्या हर्षभराने ।।६१।। गंधर्वराज
म्हणे राजपुत्रासी। पत्नी म्हणून स्वीकारा मम कन्येसी। तुमच्याशिवाय
इतर पुरुषांसी। बंधुसमान ती मानिते ।।६२।। गंधर्वराजाने घेतला कन्येचा
हात। दिला राजपुत्राच्या हातात। म्हणे सुखाने रहा जगात। श्रीशंकराच्या
कृपेने ।।६३।। मग उभयतांनी रत्नमाला। घातली उभयतांच्या गळां।
तेव्हा दशदिशांतुनी घोष झाला। 'शुभमंगल सावधान' ।।६४।। गंधर्वांचे

झाले सुस्वर गायन। अप्सरांनी केले नृत्य छान। किन्नर किन्नरींचे
वृंदवादन। काय वर्णावा सुखसोहळा ।।६५।। आशीर्वाद दिले वनदेवींनी।
१२ आणि म्हणाल्या 'उभयतांनी। सुखे नांदावे या जनी। हीच सदिच्छा १२
आमुची' ।।६६।। सासऱ्याने आपल्या जावयाला। अगणित संपत्तीचा
साठा दिला। आणि त्याच्या दिमतीला। दशसहस्र हत्ती अर्पिले ।।६७।।
नाना तऱ्हेचे दिव्यालंकार। मुगुटासहित अनेक रत्नहार। सैन्यासहित
सुवर्णरथ हजार। आणि शस्त्रास्त्रेही दिली ।।६८।। आपल्या लाडक्या
कन्येसी। हजारो दिल्या आज्ञाधारक दासी। हे राजैश्वर्य मिळता
राजपुत्रासी। आनंद मोठा जाहला ।।६९।। कन्या जावई होता खूश।
गंधर्वराजालाही झाला संतोष। मग तो आपल्या स्वर्गास। गेला निघुनी
आनंदे ।।७०।। अंशुमती आणि धर्मगुप्त। दोघे आली आपल्या राज्यात।
करुनी शत्रूचा निःपात। राज्य परत मिळविले ।।७१।। ज्योतिषांनी सुमुहूर्त

पाहिला।। राजपुत्राला राज्याभिषेक केला। सर्वत्र आनंदी आनंद झाला।
मंगलवाद्ये वाजली।।७२।। धर्मगुप्त आणि अंशुमती। बैसली सुवर्ण
१३ सिंहासानावरती। त्या राजाराणीवरती। सेवक चौऱ्या ढाळिती।।७३।। १३
ब्राह्मणी झाली राजमाता। शुचिव्रत झाला राजभ्राता। सर्वांचेच दैव
आता। उजळले होते प्रदोषव्रते।।७४।। दोघेही राजाराणी। ब्राह्मणीसुत
आणि ब्राह्मणी। प्रदोष नेमाने करुनी। न विसरिता शिव पूजिती।।७५।।
म्हणुनिच त्या तिघांप्रती। झाली व्रताची फलप्राप्ती। गेले दुःख गेली
आपत्ती। भाग्योदय त्यांचा जाहला।।७६।। मातापिता परागंदा झालेली।
त्यांची मग भेट झाली। आनंदित झाली सर्व मंडळी। प्रभाव हा
प्रदोषव्रताचा।।७७।। वैभवाने उतू नये मातू नये। प्रदोषव्रत हे सोडू नये।
म्हणजे बाहेरची लक्ष्मी घरात ये। हे माहित होते त्या सर्वांना।।७८।। हे
प्रदोषव्रत जे करतील। तेही असेच सुखी होतील। जे ही कथा वाचतील

ऐकतील। त्यांनाही ऐश्वर्य मिळेल ।।७९।। प्रदोषव्रत म्हणजे शिवभक्ती। व्रताचरणे होते इच्छित फलप्राप्ती। स्वभक्तांना तो पशुपती। सुखी ठेवी
१४ सर्वदा ।।८०।। ही व्रतकथा वाचून वा ऐकून। धर्मगुप्त राजपुत्रासमान। १४
तुमचे आमचेहि होवो कल्याण। म्हणे मिलिंदमाधव ।।८१।। मुख्य प्रदोषव्रतांची माहिती। सांगतो आता तुम्हांप्रती। सावधान चित्ते ऐका ती। आणि वागा त्याप्रमाणे ।।८२।। श्रावण किंवा कार्तिकमासी। शुक्लपक्षींची त्रयोदशी। शनिवारी आल्यास त्या दिवशी। व्रताचे विशेष महत्त्व मानावे ।।८३।। शनिवार असता त्रयोदशीस। त्यास म्हणती शनिप्रदोष। या व्रताने संतानार्थीयांस। अपत्यप्राप्ती होतसे ।।८४।। मंगळवारी येता त्रयोदशी। भौमप्रदोष असतो त्या दिवशी। ऋणमुक्त होऊ इच्छिणाऱ्यांसी। इच्छित फळ मिळतसे ।।८५।। शुक्रवारच्या प्रदोषव्रते। सौभाग्य, समृद्धि, स्त्रीप्राप्ती होते। उदंड आयुरारोग्यासाठी ते।

रविप्रदोषव्रत करावे ।।८६।। लग्नार्थी कुमारिकांनी। सौभाग्यवृद्धिस्तव सुवासिनींनी। सुखी जीवनासाठी इतर स्त्री पुरुषांनी। सोमप्रदोषव्रत
१५ करावे ।।८७।। ऐसे प्रत्यक्ष कैलासपतीनीं। सांगितले आहे स्कंदपुराणी। १५
म्हणुनी सर्व श्रद्धावंतांनी। ती ती प्रदोषव्रते करावी ।।८८।। वरील प्रदोषाचे शुभ दिवशी। ही एक-एक पोथी तीन ब्राह्मणांसी। देऊनी नमस्कार करावा त्यांसी। शिवाय नमः म्हणावे ।।८९।। असो, शके १९०० वैशाखमासी। कृष्णपक्ष गुरुवार एकादशी। ता. १ जून १९७८ दिवशी। ग्रंथ पूर्ण झाला हा ।।९०।। या पोथीच्या वाचन श्रवणाने। संतोषोत वाचक श्रोत्यांची मने। मनोरथ पूर्ण होवोत शिवकृपेने। म्हणे मिलिंदमाधव ।।९१।। ॐ शिवाय नमः। श्रीशिवार्पणमस्तु। शुभंभवतु ।। ॐ शांतिः शांतिः शांतिः ।। भक्तकवि मिलिंदमाधवकृत। 'प्रदोषव्रत माहात्म्य पूजा, कथा' संपूर्ण ।। ओवी संख्या ।।९१ ।।

ऐकतील। त्यांनाही ऐश्वर्य मिळेल ।।७९।। प्रदोषव्रत म्हणजे शिवभक्ती।
व्रताचरणे होते इच्छित फलप्राप्ती। स्वभक्तांना तो पशुपती। सुखी ठेवी
१४ सर्वदा ।।८०।। ही व्रतकथा वाचून वा ऐकून। धर्मगुप्त राजपुत्रासमान। १४
तुमचे आमचेहि होवो कल्याण। म्हणे मिलिंदमाधव ।।८१।। मुख्य
प्रदोषव्रतांची माहिती। सांगतो आता तुम्हांप्रती। सावधान चित्ते ऐका
ती। आणि वागा त्याप्रमाणे ।।८२।। श्रावण किंवा कार्तिकमासी।
शुक्लपक्षींची त्रयोदशी। शनिवारी आल्यास त्या दिवशी। व्रताचे विशेष
महत्त्व मानावे ।।८३।। शनिवार असता त्रयोदशीस। त्यास म्हणती
शनिप्रदोष। या व्रताने संतानार्थीयांस। अपत्यप्राप्ती होतसे ।।८४।।
मंगळवारी येता त्रयोदशी। भौमप्रदोष असतो त्या दिवशी। ऋणमुक्त
होऊ इच्छिणाऱ्यांसी। इच्छित फळ मिळतसे ।।८५।। शुक्रवारच्या
प्रदोषव्रते। सौभाग्य, समृद्धि, स्त्रीप्राप्ती होते। उदंड आयुरारोग्यासाठी ते।

रविप्रदोषव्रत करावे ।।८६।। लग्नार्थी कुमारिकांनी। सौभाग्यवृद्धिस्तव
सुवासिनींनी। सुखी जीवनासाठी इतर स्त्री पुरुषांनी। सोमप्रदोषव्रत
१५ करावे ।।८७।। ऐसे प्रत्यक्ष कैलासपतीनीं। सांगितले आहे स्कंदपुराणी। १५
म्हणुनी सर्व श्रद्धावंतांनी। ती ती प्रदोषव्रते करावी ।।८८।। वरील
प्रदोषाचे शुभ दिवशी। ही एक-एक पोथी तीन ब्राह्मणांसी। देऊनी
नमस्कार करावा त्यांसी। शिवाय नमः म्हणावे ।।८९।। असो, शके १९००
वैशाखमासी। कृष्णपक्ष गुरुवार एकादशी। ता. १ जून १९७८ दिवशी।
ग्रंथ पूर्ण झाला हा ।।९०।। या पोथीच्या वाचन श्रवणाने। संतोषोत
वाचक श्रोत्यांची मने। मनोरथ पूर्ण होवोत शिवकृपेने। म्हणे
मिलिंदमाधव ।।९१।। ॐ शिवाय नमः। श्रीशिवार्पणमस्तु। शुभंभवतु ।।
ॐ शांतिः शांतिः शांतिः ।। भक्तकवि मिलिंदमाधवकृत। 'प्रदोषव्रत
माहात्म्य पूजा, कथा' संपूर्ण।। ओवी संख्या ।।९१।।

# आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा। विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा।
१६ लावण्यसुंदर मस्तकी बाळा। तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझूळा ॥१॥ १६
जय देव जय देव जय श्रीशंकरा। आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा ॥धृ०॥
कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा। अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभूतीचे उधळण शितिकंठ नीळा। ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय देव० ॥२॥ देवी-दैत्यी सागरमंथन पैं केले। त्यामाजी अवचीत हाळाहळ उठिले। ते त्वां असुरपणे प्राशन केले। नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ॥ जय० ॥३॥ व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी। पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥ शतकोटीचे बीज वाचे उच्चारी। रघुकुळटिळक रामदासा अंतरी ॥ जय देव जय देव जय श्रीशंकरा० ॥४॥


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकाशक : तुकाराम बुक डेपो<br>९७, माधवबाग, सी. पी. टँक, मुंबई-४<br>दूरध्वनी : २२४२१६८९ | अक्षरजुळणी :<br>अक्षय फोटोटाइपसेटर्स,<br>डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे | मुद्रक :<br>शिवानी प्रिंटर्स,<br>गिरगाव, मुंबई-४ | नवीन आवृत्ती :<br>२०१९ |

आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, अध्यात्मिक, ज्योतिष व
शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या
होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

## तुकाराम बुक डेपो

माधव बाग, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २२४२१६८९

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com